ULHASNAGAR MUNICIPAL CORPORATION

# उल्हासनगर महानगरपालिका

आरोग्य विभाग, तळ मजला, उ.म.पा. मुख्यालय, उल्हासनगर - ४२१००३

बेटी बचाओ
save the girl child

जा.क्र.उमपा/वै.आ.वि./NUHM/१४७७/२०२४
दिनांक :-१७ /०८/२०२४

## सेवा ज्येष्ठता यादीबाबत सूचना

राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत कार्यरत सर्व कंत्राटी अधिकारी व कर्मचारी यांची दिनांक ००१/०१/२०२४ रोजीची दिनांक ३१/१२/२०२३ रोजी किंवा त्यापूर्वी रूजू झालेल्या सेवाज्येष्ठता यादी शासन पत्र क्र. एनएचएम-११२४/प्रक्र.२४५/आरोगय ७ दिनांक ३०/०७/२०२४ अन्वये तयार करण्याबाबत राज्य आरोगय सोसायटी, मुबई यांचेकडील पत्र क्र. राआसो/आस्था सेवाज्येष्ठता यादी /४३१४४-४८३/२०२४ दिनांक ३१/०७/२०२४ अन्व्ये सूचना प्राप्त झाल्या आहेत. त्यानुसार जिल्ह्यातील राष्ट्रीय आरोगय अभियानांतर्गत कार्यरत सर्व कंत्राटी अधिकारी व कर्मचारी यांची संवर्गनिहाय तापुरती सेवाज्येठता यादी (Provisional Seniority List) सकल मराठी फॉन्ट मध्ये तयार करण्यात आलेली असून प्रसिद्ध करण्यात येत आहे. तसेच सदर यादी हि महानगरपालिकेच्या www.umc.gov.in या अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

सदर यादीमध्ये आपल्या किंवा अन्य अधिकारी व कर्मचारी यांचे नावासमोर नोंदविलेल्या माहितीबाबत राष्ट्रीय आरोगय अभियानांतर्गत अधिकारी व कर्मचारी यांच्या काही हरकती असल्यास त्यांनी लेखी स्वरूपात योग्य त्या पुराव्यासह दिनांक १७/०८/२०२४ ते दिनांक २०/०८/२०२४ या कालावधीत सकाळी १०.०० ते सांयकाळी ६.०० वाजेपर्यंत सोबत जोडलेल्या विहित नमुन्यातील आक्षेप् अर्जासह पुराव्या संबंधित सर्व आवश्यक दस्ताऐवज उल्हासनगर महानगरपालिका, वॉर रूम येथे सादर करावेत. तसेच पोस्टाने अथवा अन्य मार्गाने सादर केलेले आक्षेप स्वीकारल्या जाणार नाहीत याची सर्व अधिकारी व कर्मचारी यांनी नोंद घ्यावी.
विहित कालावधीत योग्य त्या पुराव्यासह आक्षेप नोंदविण्याची जबाबदारी हि संबंधित अधिकारी व कर्मचारी यांची असून याकरिता या कार्यालयाकडून इतर कोणताही पत्रव्यव्हार केला जाणार नाही. नमूद कालावधीनंतर आलेले कोणतेही आक्षेप स्वीकारल्या जाणार नाही. प्राप्त आक्षेप विचारात घेऊन अंतिम सेवाज्येठता यादी व पुढील सूचना उल्हासनगर महानगरपालिकेच्या www.umc.gov.in या अधिकृत संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येईल. यासाठी अधिकारी व कर्मचारी यांनी वेळोवेळी सदर संकेतस्थळाला भेट देत राहावे.

(डॉ. मोहिनी धर्मा )
मा.वैद्यकिय आरोग्य अधिकारी
उल्हासनगर महानगरपालिका

# आक्षेप अर्ज

..............................................................................................................................

दिनांक :-

प्रति,
मा. वैद्यकिय आरोग्य अधिकारी,
उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

**विषय :-** एनएचएम अंतर्गत कंत्राटी --------------------------------------पदाच्या तात्पुरती सेवा ज्येष्ठता यादीमध्ये नोंदविलेल्या माहिती संबंधाने आक्षेप सादर कीत असल्याबाबत
अ.क्र.-------------------------नांव ----------------------------------------------------

महोदय,

उपरोक्त विषयाचे अनुषंगाने आपणास सविनय विनंती करण्यात येते की, राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत प्रसिद्ध करण्यात आलेल्या सेवा ज्येष्ठता यादीमध्ये माझे -------------------------------------------------------( अन्य अधिकारी/कर्मचारी असल्यास नांव लिहावे) यांचे नावासमोर असलेल्या माहितीमध्ये खालीलप्रमाणे त्रुट्या आहेत.

| अक्र | यादीमध्ये नमुद माहिती | त्याऐवजी करावयाची दुरूस्ती |
|---|---|---|
| | | |
| | | |
| | | |
| | | |

माझेकडे सदर बाबीचे/माहितीचे वैध दस्ताऐवज असून मी यासोबत पुरावा म्हणून जोडत आहे. तरी माझ्येद्वारा सादर केलेल्या आक्षेपा बाबत योग्य ते बदल घेण्यात यावे ही विनंती.

सोवत पुरावा १).......................................................................
२).......................................................................
३).......................................................................
४).......................................................................
५).......................................................................

.......................................................

**(अधिकारी/कर्मचारी स्वाक्षरी)**